स्वामी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्यविद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)

पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

संशोधन शिर्षक

"अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास"

संशोधक

मयुरी जयप्रकाश वानखेडे

मार्गदर्शक

डॉ.एल.एच.पाटील

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय, उदगीर जि.लातूर.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा

चेअरमन अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, स्वा.रा.ती.म.वि.नांदेड,

संशोधन केंद्र

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय, उदगीर, जि, लातूर.

जुन, 2025

"अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना:

भारत हा कृषी प्रधान देश आहे. देशाच्या एकूण लोकसंख्यापैकी ८३.३ करोड लोक ग्रामीण भागात राहतात. देशाच्या २/३ लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. वाढत्या लोकसंख्येचा शेतीवर पडणारा ताण. मागासलेली शेती ही भारतीय शेतीची वैशिष्ट्ये आहे. त्यामध्ये सर्वात महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे शेतीमध्ये असलेली छुपी बेकारी, कमी करण्यासाठी कृषी वर आधारित व कृषीला जोड व्यवसाय सुरु करणे आवश्यक आहे.

प्राचीन काळापासून ग्रामीण भाग आणि खेडी काही अंशी स्वयंपूर्ण होती. खेड्यात असलेले लघु आणि कुटीर उद्योग हे प्रामुख्याने शेती उत्पादनातील कच्च्या मालावर अवलंबून होते. ब्रिटिशांच्या राजवटीत हे उद्योग नष्ट झाले. त्यामुळे शेतीवर उपजिवीका करणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढले. हरितक्रांतीचे जनक डॉ. स्वामीनाथन च्यामते, कृषी १०,००० वर्ष जुना उद्योग आहे. ज्याचा इतिहास मोहनजोदडो आणि हडप्पा संस्कृती पर्यंत जातो. हेच नाही तर त्यांचे असे म्हणणे आहे की, फक्त आणि फक्त कृषीमध्ये ती क्षमता आहे, ज्यामुळे देशाचा सर्वसमावेशक विकासाबरोबरच पुढे जाऊ शकतो. यासाठी कृषीला रोजगाराशी जोडणे आवश्यक आहे. सरकारला देखील औद्योगिकरणासाठी सबसिडी देण्याबरोबरच कृषी शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीकापैकी ७० टक्के पीक लोकसंख्येसाठी सहयोगात्मक ठेवणे आवश्यक आहे. देशातील औद्योगिकीकरण झपाट्याने होत असताना देखील शेतीवर अवलंबून असणाऱ्याची संख्या मात्र कमी होताना दिसत नाही. वाढत्या लोकसंख्येचा शेतीवर पडणारा ताण शेतीमध्ये असलेली सुप्त बेरोजगारी वाढत आहे. त्यावर आळा घालण्यासाठी कृषीआधारित उद्योग महत्वाचे ठरतात. ग्रामीण भागात शेतीवर आधारित उद्योग निर्माण झाल्यास ग्रामीण भागातील लोकांना उपजीविकेसाठी रोजगाराचे साधन उपलब्ध होईल. त्यामुळे रोजगारानिमित्त शहराकडे धाव घेणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होईल. म्हणूनच स्थलांतराला

आळा घालण्यासाठी अशा उद्योगाची गरज असते. तसेच प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उद्योगाचे विकेंद्रीकरण होण्यासाठी असलेल्या साधनसामग्रीचा योग्य उपयोग करणे आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी कृषी आधारित उद्योगाला अनन्यसाधारण असे महत्व आहे.

भारतीय फळांमध्ये संत्र्याला विशेष स्थान आहे. हे फळ मूळ चिनी प्रांतातले आहे. या फळाचे चीनमध्ये शास्त्रीय नाव पोंकान चायनीज मॅन्डरीन ऑरेंज असे आहे. चीनमध्ये शुभकार्य व मंगल प्रसंगी हे फळ वापरतात. विशेषतः नववर्षाला एकमेकांना भेट म्हणून संत्री दिली जातात. बुद्ध मंदिरात हे फळ अत्यंत पवित्र भावनेने भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तिसमोर ठेवले जाते. या फळाला जागतिक मान आहे. जगात सर्वात जास्त ज्यूस संत्रा मोसंबी या फळांचाच विकला जातो. भारतात सवाष्णींची जेव्हा पाच फळांनी ओटी भरतात त्यामध्ये संत्रे हे एक फळ वापरले जाते. ही ओटी विशेषतः सणांना किंवा काही मंगलकार्य असले तर भरतात. भारतात जे स्थान श्रीफळाचे (नारळ) आहे ते स्थान चीनमध्ये संत्र्याला आहे. श्रीफळ आणि केळ हे आपल्याकडे मांगल्याचे आणि सृजनाचे प्रतीक आहे. तसे संत्रे हे चीनमध्ये मांगल्याचे, सौहार्दाचे आणि प्रेमाचे प्रतीक समजले जाते. जगामध्ये आज जवळपास ४५० प्रकारची ऑरेंजेस् उपलब्ध आहेत. प्रत्येकाची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत. या निरनिराळया प्रकारच्या व्हरायटींनी स्वतःचा रंग, चव, वास, उपभोक्त्यांना आनंद देण्याची क्षमता, सुगंध, उपयोगिता, दुसऱ्यात मिसळून एकरूप होण्याचा गुणधर्म, आंबटपणा सारे काही आपल्या सामर्थ्यानिशी जपून स्वतःची वेगळी ओळख टिकवून ठेवली आहे. भारतातही अनेक प्रकारची संत्री उपलब्ध आहेत. पण महाराष्ट्रात संत्रे म्हटले की, विदर्भ हा प्रांत आणि नागपूर मॅन्डरीन ऑरेंज हेच नाव समोर येते.

महाराष्ट्रातील संत्र्याची नागपूर संत्रा ही जात त्याच्या अप्रतिम चवीमुळे जगप्रसिद्ध आहे. कारण या फळांची आंबट-गोड चव सर्वांना आवडते. भारतात संत्र्याचे ४१%, मोसंबीचे २५% आणि कागदी लिंबाचे २५ % क्षेत्र लागवडीखाली आहे. भारतात लिंबूवर्गीय फळांची सर्वात जास्त

उत्पादकता तामिळनाडू या राज्याची (१७.६३ टन/हेक्टर) असून, महाराष्ट्राची १०.१६ टन/हेक्टर आहे. तर विदर्भातील काही संत्राबागांची २० ते २५ टन/हेक्टर उत्पादन देण्याची क्षमता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात उत्पादन वाढविण्यास भरपूर वाव आहे. संत्र्याची लागवड प्रामुख्याने विदर्भात, मराठवाड्यात आणि पश्चिम महाराष्ट्रात केली जाते.

विदर्भाची काळीभोर जमीन संत्र्याची आई आहे. काही ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे व भूजल उपशाच्या तुलनेत पुनर्भरण न झाल्यामुळे संत्रा बागांचे क्षेत्र थोडे फार कमी जास्त होते आहे. कधीमधी भावाचा किंवा नैसर्गिक संकटाचा (उदा. गारपीट, अवकाळी पाऊस, तापमान वाढ, वादळवारा वगैरे.) तडाखा बसला की क्षणार्धात होत्याचे नव्हते होते. संत्रा बागायतदार हवालदिल होतो. क्षणार्धात बाग उपटून टाकावी असा विचार मनात घर करतो. परंतु मन थोडे स्थिर स्थावर झाल्यावर काही का होईना बाग ठेवावी असा विचार करून तो संत्रा झाडांना पुन्हा जीव लावित बसतो. संत्र्यावर लागवडीपासून प्रक्रियेपर्यंत आणि रोपे कलमे बनविण्यापासून सालीच्या वापरापर्यंत विविध अंगांनी निरनिराळे प्रयोग व संशोधन चालू आहे. संत्र्याची पावडर उत्तम असते. संत्र हे फळ उत्तम पाचक आहे तर त्याच्या शिरा व चोथा रेचक आहे. सी व्हिटॅमिन आणि ॲन्टीकॅन्सर यामुळे त्याचे महत्त्व खूप वाढले आहे. संत्रे हे आरोग्याला अत्यंत लाभदायी आहे. त्याच्या गराची बर्फी बनते आणि सालीपासून सुगंधी द्रव्ये बनतात तर लिंबूवर्गीय फळांपासून साबण व सौंदर्य प्रसाधने बनतात. संत्र्याची साल वाळवून तीही वापरात आणतात. भारतात दोनशे वर्षांहून अधिक काळ वापरात असलेले संत्रे हे फळ परंपरागतरित्याही उत्कृष्ट आहे. परंतु या फळावर आता आजच्या अभ्यास, प्रयोग व संशोधनानुसार जगभर जे काही महत्त्वाचे संस्कार झाले आहेत व त्यामुळे जो काही आमूलाग्र बदल झाला आहे व होतो आहे, त्याचा मागोवा घेणे अत्यावश्यक असून आधुनिक शेतीतला तो अनिवार्य भाग बनला आहे. शेतकऱ्यांनी या सर्व नवीन बदलांची डोळे उघडे ठेवून दखल घेतली पाहिजे. इत्यादींचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे.

संत्रा हे लिंबुवर्गीय फळ असून सत्रांच्या गोड आंबट व रसाळ अशा अविट चवीमुळे संत्रा हे जगात सर्वाधिक उत्पादीत होणारे फळ आहे. लिबूवर्गीय फळात संत्रा व्यतिरीक्त मोसंबी, लिंबू, इडलिंबु, सुईलिंबु यासारख्या अनेक फळाचा समावेश होतो. परंतु संत्र्यांला आज लिंबूवर्गीय फळाचा राजा मानल्या जाते. जागतिक स्तरावर महत्वपूर्ण भुप्रदेश असलेल्या फळाचे जन्मस्थान भारताचा उत्तरपूर्व आणि चिनचा दक्षिणपुर्व भुप्रदेश हा आहे. भारत आणि चीन या दोन देशातुनच संपुर्ण जगात संत्रा या फळाचा विकास आणि विस्तार झाला आहे. एकेकाळी, भारत आणि चिनच्या या प्रदेशात जंगली फळ मानल्या जाणाऱ्या या संत्राला वाढत्या जागतिक व्यापारातुन संत्राचे व्यापारी महत्व वाढत गेले. संत्र्याच्या गोल आकर्षक आकार आणि नारिंगी रंगामुळे संत्रा या भारतीय फळाने इंग्रजीमध्ये orange हे नाव धारण केले. संत्रा हे नाव संस्कृत मध्ये 'नारगाह' असे आहे तर तामिळ भाषेत याला' नारंगी' असे म्हटल्या गेले. आणि आज नारंगी हे नाव रुढ झाले. संशोधकाच्या म्हणण्यानुसार इ.स. १५१२ मध्ये नारिंगी या रंगाला नारंगी हे नाव संत्राच्या रंगावरून मिळाले. म्हणूनच नारंगी या रंगाचा संत्रा हा जन्म स्रोत आहे.

समस्या सुत्रण:

प्रस्तुत संशोधनासाठी "अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास" या विषयाची निवड करण्यात आली आहे. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अवकाळी पाऊस, वारा, बाजारपेठेत मिळणारा कमी भाव, वाहतुकीचा खर्च, साठवणूकीची समस्या, निर्यातीच्या अडचणी, उत्पादीत माल विक्री केल्यानंतर वेळेवर पैसे न मिळणे. याशिवाय शासनाची उदासीनता, वाढता खर्च, किंमतीतील चढ-उतार, विपणनाच्या समस्या, मजुरांचा प्रश्न अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यावर उपाय सुचविण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड संशोधनासाठी केलेली आहे.

विषयाचे महत्व:

अमरावती जिल्ह्यातील संत्रा हे फळ लिंबाच्या जातकुळीतीलच असून नागपुरी, खान्देशी, रेशमी, कलबा या जाती जास्त प्रसिद्ध आहेत. संत्र्यामध्ये जीवनसत्त्व क, ॲन्टि ऑक्सिडन्टस, तंतुमय पदार्थ, प्रथिने, मिनरल्स (खनिजे) तसेच आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची फ्लॅवोनॉईड्स हे घटक भरपूर प्रमाणात आहेत. याच कारणांनी संत्री हृदयासंबंधित आजार, कॅन्सर, मधुमेह अशा विविध आजारांवर उपयोगी ठरत आहेत. संत्र्यांचा फळ म्हणून तसेच रस, जॅम, जेली, सिरप, स्कॅश अशा विविध स्वरुपात आहारात वापर केला तर नक्कीच आपले आरोग्य सुधारण्यास मदत होईल.

औषधी गुणधर्म:

कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, जीवनसत्त्व क या शरीररक्षक अन्नघटकांनी संत्रे परिपूर्ण असल्याने निरोगी राहण्यासाठी व शरीराच्या वाढीसाठी ते बहुमोल आहे. संत्र्यामध्ये सर्वात जास्त कॅल्शिअम असते. याशिवाय त्यात भरपूर असणाऱ्या 'क' जीवनसत्त्वामुळे अन्नातील कॅल्शिअमचा वापर शरीरातील पेशींना विनाअडथळा करता येतो. याशिवाय संत्र्यामध्ये प्रथिने, तंतुमय व पिष्टमय पदार्थही असतात. आयुर्वेदानुसार संत्रे मधुर आम्ल चवीचे अग्निप्रदीपक, दाहशामक, ज्वरहारक, तृषाशामक, रक्तपित्तशामक, अरुचीनाशक, लघु, हृदय व बलकारक आहे. संत्र्याची साल, पाने, फुले व फळ या सर्वामध्ये विविध औषधी गुणधर्म आहेत. तसेच शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारण्या होण्यामध्ये संत्रा हे पिक महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने प्रस्तुत संशोधनासाठी सदरील विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

1. अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची माहिती जाणून घेणे.
2. संत्रा लागवडीच्या पध्दतीचा अभ्यास करणे.
3. अमरावती जिल्ह्यातील संत्रा फळांच्या विपणाचा अभ्यास करणे.

4. अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी कुंटुंबाच्या आर्थिक सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
5. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी परिणामकारक उपाय योजना सुचविणे.

संशोधनाची गृहितके:

1. अमरावती जिल्ह्यात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा वाटा जास्त आहे.
2. संत्रा लागवडीच्या पध्दतीत सुधारणा झाली आहे.
3. अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.
4. अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या राहणीमात सुधारणा झाली आहे.
5. बाजार पेठातील किंमतीतील चढ उतारामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

प्राथमिक स्त्रोत:

संशोधन समस्येच्या अनुषंगाने आपल्याला हवी असणारी माहिती स्वत:मिळविणे. या पध्दतीने मिळविलेल्या माहितीला प्राथमिक तथ्य सामग्री असे म्हणात.

अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांची भविष्यातील फळभाग लावगड रणनिती व मर्यादा इत्यादींच्या संदर्भातील माहिती प्राथमिक स्त्रोतावर आधारलेली आहे. ही माहिती स्व:उपस्थिती राहून प्रत्यक्ष अवलोकन, मुलाखत अनुसूची व प्रश्नावली च्या सहाय्याने संकलित करण्यात येणार आहे.

द्वितीय स्त्रोत:

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी आवश्यक ती माहिती संकलनासाठी केंद्र व राज्य शासनाचे संत्रा व फळबाग विषयीचे दस्तावेज, शासन निर्णय, अहवाल, परिपत्रके, जणगणना अहवाल, सामिजक अहवाल, विषयाच्या संबंधीत विविध संदर्भ ग्रंथ, शोध प्रबंध, विशेषांक, प्रसध्दि साहित्य आणि वर्तमानपत्रे, मासिके, शोधनिबंध, लेख व विविध संगणकीय संकेत स्थळे इत्यादींच्या आधारे माहिती संकलीत करण्यात आली आहे. त्या बरोबरच विविध विद्यापीठातील प्रकाशित व संदर्भसाहित्याचा आढावा घेऊन द्वितीय स्त्रोतांद्वारे माहिती संकलीत करण्यात येणार आहे.

नमुना निवड:

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी विदर्भातील अमरावती जिल्ह्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. संशोधनाच्या अभ्यासाठी यादृच्छिक नमूना निवड पध्दतीने नमूना निवडीद्वारे अमरावती जिल्ह्यातील चौदा तालुक्यातील 400 शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. सर्वेक्षण मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. संबंधीत संकलीत माहितीची मांडणी वर्णनात्माक व विश्लेषणात्मक पध्दतीने करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी:

"अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास" करताना त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत झालेले बदल अभ्यासण्यासाठी काळ हा घटक महत्त्वाचा ठरतो. म्हणून प्रस्तुत संशोधनाचा कालावधी 2015 ते 2025 असा दहा वर्षाचा कालावधी अभ्यासाठी निवडलेला आहे.

व्याप्ती व मर्यादा:

महाराष्ट्रात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे क्षेत्र विविध जिल्ह्यात आहे. परंतु सर्वाधिक उत्पादन हे नागपूर व अमरावती जिल्ह्यातील आहे. प्रस्तुत संशाधनाची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन प्रस्तुत संशाधनासाठी अमरावती जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.

प्रकरण मांडणी:

प्रस्तुत संशोधनात निवड करण्यात आलेल्या विषयाची योग्य व सूत्रबध्द पध्दतीने मांडणी करण्याच्या दृष्टीने आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्याची पुढील सहा प्रकरणात विभागणी करण्यात आली आहे. ते पुढील प्रमाणे-

1. **प्रस्तावना**
2. **संशोधन पध्दती व संदर्भ साहित्याचा आढावा**
3. **अमरावती जिल्ह्याची पार्श्वभूमी**
4. **महाराष्ट्रातील संत्रा उत्पादनाची स्थिती**
5. **संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**
6. **निष्कर्ष व शिफारशी**

संदर्भ:

1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२३-२४.
2. प्रा. हरिहर प्र. गायके, कृषी शास्त्र, ऑर्किड प्रकाशन लातूर.
3. नानासाहेब पटनुरे, सोमवंशी मनोजकुमार, ग्रामीण अर्थशास्त्र, अरुणा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, 2 ऑक्टोबर 2016.
4. बिरादार माधव, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन 2012.
5. कृषितीर्थ, स्वीट ऑरेंज विशेषांक, जानेवारी 2019.
6. पूर्वा कृषिदूत, सप्टेंबर 2020.
7. कित्ता फेब्रुवारी 2024.
8. के.ए.खतीब, महाराष्ट्राचा भूगोल, के.सागर पब्लिकेशन्स, पुणे, आवृत्ती चोवीसावी, 2017.
9. डॉ. बी. डी. कुलकर्णी, डॉ एस. व्ही. ढमढेरे अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती.

10. बोधनकर व अनोली, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2003.

10. घाटोळे रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2008.

11. कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर, तृतीय आवृत्ती-2011.

12. आगलावे प्रदिप. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर. 2000.

13. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, अमरावती-2023-24.

14. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, लोकराज्य,

एप्रिल-मे 2023.

संशोधक

मयुरी जयप्रकाश वानखेडे

मार्गदर्शक

डॉ.एल.एच.पाटील

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय, उदगीर जि.लातूर.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा

चेअरमन अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, स्वा.रा.ती.म.वि.नांदेड,